जा.क्र.स्टेशनरी/ 9269 /२०२५
नगर दिवाणी व सत्र न्यायालय
मुंबई—४०००३२.
दिनांक: 29 APR 2025

प्रति,

१) अतिरिक्त प्रबधंक,
नगर दिवाणी व सत्र न्यायालय,
बोरीवली सत्र विभाग, दिडोंशी,
जनरल अरूणकुमार वैद्य मार्ग,
गोरेगाव पूर्व, मुंबई — ४०० ०९७.

२) प्रबंधक,
लघुवाद न्यायालय,
धोबी तलाव, मुंबई.

३) प्रबंधक,
मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे कार्यालय,
महापालिका मार्ग, एस्पलेनेड, मुंबई—४०० ००१.

४) सहा. प्रबंधक,
नगर दिवाणी व सत्र न्यायालय,
माझगांव, मुबंई

विषय :— <u>निविदा सुचना नोटीस बोर्डावर लावण्याबाबत.</u>

महोदया/महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुबंई या कार्यालयाच्या आस्थापनेसाठी A4 आकाराचे पेपर ठेवता येईल असे प्लास्टिकचे ट्रे याची आवश्यकता असल्याने संबंधितांकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रत आपल्या कार्यालयाच्या मुख्य नोटीस बोर्डावर लावण्याकरिता आपणांस पाठवित आहे.

तरी पाठविण्यात आलेल्या निविदा सूचनेची प्रत आपल्या कार्यालयाच्या मुख्य नोटीस बोर्डावर लावून या कर्यालयास अवगत करावे ही विनंती.

आपली विश्वासू,
प्रबंधक 28/4/2025
नगर दिवाणी व सत्र न्यायालय,मुंबई.

**मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालय, जुने सचिवालय आवार,**
**फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.**
**email: ctcourt-mum@nic.in**
**फोन नं. ०२२—२२८४ ४१३४**

# जाहीर सूचना

मा. लेखनसामुग्री समिती, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई, यांचे आदेशानुसार या कार्यालयाच्या आस्थापनेसाठी १७४ नग A4 आकाराचे पेपर ठेवता येईल असे प्लास्टिकचे ट्रे (सोबत जोडलेल्या नमूना—अ प्रमाणे) स्वारस्य असलेल्या संबंधित पुरवठादार/ उत्पादकांकडून खुल्या बाजारातून दरपत्रकाद्वारे खरेदी करण्यात येणार आहेत.

तरी स्वारस्य असलेल्या संबंधित पुरवठादार/उत्पादकांनी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून खरेदी प्रक्रियेत भाग घ्यावा:—

| | |
|---|---|
| १. | पुरवठादार/उत्पादकाने पूर्वी शासन स्तरावरच्या अशाप्रकारच्या खरेदी प्रक्रियेत सहभाग घेतलेला असावा. |
| २. | खरेदी दरपत्रक सोबत जोडलेल्या नमुना प्रपत्रात मोहोरबंद लिफाफ्यामध्ये सादर करावे. मोहोरबंद लिफाफ्यामध्ये नमुना प्रपत्राप्रमाणे नसलेले खरेदी दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल. |
| ३. | मोहोरबंद लिफाफ्यातील खरेदी दरपत्रक प्रस्तुत जाहीर सूचना प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून (दिनांक २९.०४.२०२५ ते ०५.०५.२०२५) सार्वजनिक सुटटीवगळता, हमदस्त (By Hand) अथवा टपालाद्वारे (By Post/RPAD/Speed Post etc) प्रबंधक, नगर दिवाणी न्यायालय, जुने सचिवालय आवार, मुंबई—४०० ०३२ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.३० दरम्यान पोहोच होतील याची दक्षता घ्यावी. उपरोक्त मुदती पश्चात प्राप्त मोहोरबंद लिफाफ्यांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही अथवा अपात्र ठरविण्यात येतील. |

| | |
|---|---|
| | |
| ४. | मोहोरबंद लिफाफ्यावर **"प्लास्टीक ट्रे खरेदीकरीता दरपत्रक निविदा"** असे स्पष्ट लिहावे. स्पष्ट उल्लेख नसलेले मोहोरबंद लिफाफ्यांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही. |
| ५. | उपरोक्त परिच्छेद ३ प्रमाणे विहित मुदतीत प्राप्त झालेले मोहोरबंद लिफाफे दिनांक ०६.०५.२०२५ रोजी दुपारी २:३० वाजता न्यायालय क्र. २२ , दूसरा मजला, जुनी इमारत ,नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई—४०० ०३२, येथे उघडण्यात येतील. केवळ पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या किंमतीचे खरेदी दरपत्रक विचारात घेण्यात येतील आणि खरेदीचा निर्णय न्युनतम—१ (L-1) च्या आधारे घेण्यात येईल. |
| ६. | मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या दिवशी व वेळी संबंधित पुरवठादार/ उत्पादकांचे अधिकृत प्रतिनिधीनी उपस्थित रहावे. ज्या पुरवठादार/उत्पादकांचे अधिकृत प्रतिनिधी वरील दिवशी व वेळी उपस्थित राहणार नाहीत त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ७. | पुरवठादार/उत्पादक या व्यक्ती किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा—या अन्य व्यक्ती/संस्थेमध्ये थेट स्वारस्य असता कामा नये आणि असे स्वारस्य दिसून आल्यास त्यास 'हितसंबंधाचा संघर्ष' समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील. |
| ८. | कमीत कमी तीन वेगवेगळया पुरवठादार/उत्पादकांकडून मोहोरबंद लिफाफ्यात दरपत्रक प्राप्त न झाल्यास सदर प्रक्रियेला एका आठवडयाची मुदतवाढ देण्यात येईल आणि मुदतवाढीत आवश्यक दरपत्रके प्राप्त न झाल्यास प्रक्रिया पुन्हा नव्याने राबविण्यात येईल. |
| ९. | उपरोक्त वस्तुंच्या खरेदीसंदर्भात या कार्यालयाने निर्धारित केलेल्या वित्तीय अंदाजपत्रकास अनुसरून, सदर वस्तुंची प्रत्यक्ष खरेदी कमी/जास्त प्रमाणात करण्यात येईल आणि त्यासंबंधी पुरवठादार/उत्पादकास कोणताही आक्षेप |

| | |
|---|---|
| | राहणार नाही. |
| १०. | अंतिम निवड झालेला पुरवठादार/उत्पादक खरेदी आदेशात नमूद प्लास्टीक ट्रे मा. प्रबंधक, नगर दिवाणी न्यायालय, जुने सचिवालय आवार, मुंबई—४०० ०३२ येथे त्यासंबंधीतचा आदेश प्राप्त झाल्यापासून त्वरीत व जाहिर सूचनेतील तपशिलाप्रमाणे पुरवठा करणेस बंधनकारक असेल आणि त्या पुरवठाकामी होणारा कोणताही वाहतूक अथवा हमाली खर्च/शुल्क या कार्यालयाद्वारे अदा केले जाणार नाही. |
| ११. | देयक रक्कम प्रदान करतेवेळी कोणतेही अतिरिक्त शुल्क/विलंब आकार अदा केले जाणार नाही. |
| १२. | खरेदी आदेशात नमूद प्लास्टीक ट्रे यांचा पुरवठा जाहिर सूचनेतील तपशिलाप्रमाणे नसल्यास अथवा खराब असल्यास, पुरवठादार/उत्पादक स्व:खर्चाने सदर प्लास्टीक ट्रे बदलून पुरवठा करावा लागेल. |
| १३. | वरील खरेदी प्रक्रियेचे सर्व अधिकार मा. खरेदी समितीकडे राहतील. |

ठिकाण: मुंबई

दिनांक: २९/०४/२०२५.

प्रबंधक 29/4/2025

नगर दिवाणी न्यायालय, मुंबई.

# नमुना दरपत्रक प्रपत्र ( SPECIMEN)

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | : | खालील तक्त्याप्रमाणे प्लास्टीक ट्रे नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांचे कार्यालयास पुरवठा करणे |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचे/कंपनीचे नाव | : | |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | : | |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचा/कंपनीचा संपर्क दूरध्वनी | : | |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचा/कंपनीचा नोंदणी क्रमांक | : | |
| पुरवठादार/उत्पादकच्या संस्थेचा/कंपनीचा वस्तू व सेवा कर क्रमांक | : | |

| अ. क्र | लेखनसामुग्रीचा तपशील | मागणी करण्यात आलेल्या एका वस्तूची किंमत (रुपये) | एकूण वस्तू व सेवा कर (रुपये) | मागणी करण्यात आलेल्या एका वस्तूची किंमत करा सहित (रुपये) (स्तंभ ३+४) | मागणी करण्यात आलेल्या वस्तूची एकूण संख्या | एकूण रक्कम वस्तू व सेवा करासहित (रुपये) (स्तंभ ५ X ६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १ | प्लास्टिक ट्रे (Plastic Trey ) (28cm x 37cm x 7cm) | | | | १७४ नग | |
| | एकूण | | | | | |

एकूण रक्कम रू.............

—(अक्षरी रूपये.................................................................)

(पुरवठादार/उत्पादकाचे नाव, सही, शिक्का, दिनांक)

टिप:— स्तंभ क्र. ३, ४,५ व ७ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

"नमुना- अ"

